# फ्लिपकार्टने केली प्रादेशिक भाषांची सेवा अधिक सक्षम, आता मराठीतही अॅप उपलब्ध

फ्लिपकार्ट आता मराठीत

- *वापरकर्त्यांना आता फ्लिपकार्ट अॅपवर सहा भाषांमध्ये ई-कॉमर्स अनुभव घेता येणार*
- *भारतातील तिसऱ्या क्रमांकाच्या बोली भाषेत म्हणजेच मराठीत वैयक्तिक आणि संवादी पद्धतीने ई-कॉमर्सचा अनुभव*
- *वापरकर्त्यांना भाषेचा अडसर जाणवू नये यासाठी ५.४ दशलक्षांहून अधिक शब्दांचे भाषांतर*

**बंगळुरु, ७ जानेवारी २०२१ :** फ्लिपकार्ट या भारतातील एतद्देशीय बाजारपेठेने मराठी भाषा सादर करून आपल्या प्रादेशिक भाषेच्या सेवेला अधिक बळकटी दिली आहे. *मराठी ही भारतातील तिसऱ्या क्रमांची बोली भाषा आहे.* यासह फ्लिपकार्ट अॅप आता इंग्रजी, हिंदी, मराठी, कन्नड, तमिळ आणि तेलुगु अशा सहा महत्वाच्या भाषा वापरकर्त्यांसाठी उपलब्ध आहेत. यामुळे भारतीय ग्राहकांसाठी ई कॉमर्स अधिक सर्वसमावेशक सहज उपलब्ध करून देण्याची आपली बांधिलकी फ्लिपकार्टने अधिक बळकट केली आहे.




मराठी भाषेची भर घालणे हा महत्वाचा टप्पा मानला जात आहे. कारण, २०११ च्या जनगणनेनुसार ही भारतातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे. लाखो फ्लिपकार्ट वापरकर्त्यांना वैयक्तिक आणि बोलीभाषेतील अनुभव देण्यासाठी ५.४ दशलक्षांहून अधिक शब्दांचे भाषांतर आणि लिपित लेखन (ट्रान्सलिटरेशन) करण्यात आले आहे. फ्लिपकार्टच्या 'लोकलायझेशन अॅण्ड ट्रान्सलेशन प्लॅटफॉर्म'वर उपलब्ध ही सोय ग्राहकांना ईकॉमर्सचा अथपासून इतिपर्यंत सहजसुंदर अनुभव देणार आहे.

ई-कॉमर्सकडे वळणाऱ्या भारतीय ग्राहकांसमोरील समस्या सोडवण्यासाठी नाविन्यपूर्ण पर्याय देण्याच्या फ्लिपकार्टच्या प्रयत्नांचा भाग म्हणून या व्यासपीठावर प्रादेशिक क्षमतांचा विकास करण्यात येत आहे. प्रादेशिक भाषा बोलणाऱ्या लाखो ग्राहकांसमोरील मुख्य अडथळा यामुळे दूर होणार आहे. या क्षेत्रातील घडामोडींनुसार, भारतीय भाषांमध्ये इंटरनेटचा वापर करणाऱ्या वापरकर्त्यांची संख्या २०२१ पर्यंत ७५ टक्के असेल आणि द्वितीय आणि तृतीय श्रेणी शहरांमधील फ्लिपकार्ट वापरकर्त्यांची संख्या ५० टक्क्यांहून अधिक असल्याने प्रादेशिक सेवांचा विस्तार वाढवणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**फ्लिपकार्टचे चीफ प्रोडक्ट अॅण्ड टेक्नॉलॉजी ऑफिसर जयेंद्रन वेणुगोपाल** म्हणाले, *"भारतातील ग्राहकांसाठी ई-कामर्स अधिक अधिक समीप आणणे व त्यात नाविन्यता आणणे या आमच्या प्रयत्नांचा भाग म्हणून आम्ही गेल्या दोन*

*वर्षांत आमचा प्रादेशिक भाषांचा व्याप लक्षणीय प्रमाणात वाढवला आहे. आमच्या व्यासपीठावरील सहा प्रादेशिक भाषांमध्ये मराठीचा समावेश करणे म्हणजे ई-कामर्स अधिक सर्वसमावेशक करण्याच्या आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे आणि भाषेचे अडसर दूर करण्यात त्याची महत्त्वाची भूमिका असेल. या सर्व घडामोडी म्हणजे फ्लिपकार्टवर प्रादेशिक सेवांचा विस्तार करण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा भाग असून त्यामुळे देशभरातील लाखो ग्राहकांसाठी ई-कामर्स अधिक सहज उपलब्ध आणि सोयीस्कर होऊन भारतात ई-कामर्सचे लोकशाहीकरण करण्यात कळीची भूमिका बजावेल.”*



आणखी २०० दशलक्ष ग्राहकांना ऑनलाइन आणण्याच्या आपल्या प्रयत्नांचा भाग म्हणून फ्लिपकार्टने व्हिडीओ, व्हॉईस आणि प्रादेशिक या तीन विभागांत अनेक उपक्रम सादर केले आहेत. २०१९ पासून ज्या ९५ टक्के ग्राहकांनी प्रादेशिक भाषेचा वापर आमच्या व्यासपीठावर केला, ते अजूनही प्रादेशिक भाषेचाच वापर करत आहेत. यामुळे डिजिटल व्यासपीठांवर प्रादेशिक भाषांना पसंती दिली जाते, हे स्पष्ट झाले आहे.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and Flipkart Wholesale. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 300 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

**For more information, please contact media@flipkart.com.**